# MT

Seat No. 

**2018 .... .... 1100**

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - II - PAPER - V**

**Time : 3 Hours** **(Pages 9)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

**प्र.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** 1

(i)




(ii) **कंसातील योग्य पर्याय निवडून रिकामी जागा भरा.** 1

त्यावेळी उत्तरपत्रिकेची किंमत फक्त असायची.............. पैसे. (एक, दोन, तीन, चार)

या युनियन हायस्कूलमधले शिक्षक, त्यांची सेवाभावी वृत्ती, विद्यार्थ्यांना शिकवताना त्यामध्ये त्यांचे स्वत:ला झोकून देणे आणि निरपेक्ष भावनेने केलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या केवळ शालेय अभ्यासाचाच पाया पक्का झाला असं नाही, तर आयुष्याचाच पाया पक्का झाला. शिक्षणाबद्दल एक आंतरिक ओढ वाटू लागली.

आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे. आमचं हायस्कूलही गरीब होतं, त्यामुळं उत्तरपत्रिका घरून न्यावी लागायची. त्यावेळी तिची किंमत फक्त तीन पैसे असायची. आपल्याला कदाचित पटणार नाही; पण तेव्हा दर आठवड्याला हे तीन पैसे उभे करताना देखील माझ्या आईच्या डोळ्यांत पाणी उभं राहायचं. आजही हे आठवलं, की माझ्या अंगावर काटा उभा राहतो. तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले. पडेल ते काम केले. काँग्रेस हाऊसजवळ काही काम मिळणार आहे, असं समजल्यानं एकदा ती तिकडं गेली. रांगेत उभी राहिली, तशीच ताटकळत; पण त्यावेळी तिला सांगण्यात आलं, की फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाईल. हे ऐकून अर्थातच ती नाराज झाली, घराकडं मागं फिरली. त्याच वेळी तिनं ठरवलं, की 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही'.

तिनं प्रत्यक्षात केलंही तसंच. माझ्यासाठी तिनं घेतलेले कष्ट कोणत्या शब्दांतून सांगू? कोरे, पाठकोरे, लिहून उरलेले कागद ती एकत्र जमवायची आणि त्याच्या वह्या करून द्यायची. अखंड पेन्सिल मला मिळणं अवघड होतं. त्यामुळं जेमतेम हातात धरता येईल अशा पेन्सिलनेच लिहावं लागे.

(२) (i) **कारण लिहा.** 1

लेखकाला चाचणी परीक्षेची उत्तरपत्रिका घरूनच न्यावी लागे कारण .....

(ii) **एका वाक्यात उत्तर लिहा.**

लेखकाच्या हायस्कूलमध्ये नेहमी कोणत्या दिवशी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे ? 1

(३) **व्याकरण :**

(i) **समानार्थी शब्द लिहा.** 1

(अ) सप्ताह - ☐ (आ) जीवन - ☐

(ii) **अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** 1

<u>ती</u> नाराज झाली, घराकडं मागं फिरली.

(४) **स्वमत :** 2

युनियन हायस्कूलमधील शिक्षकांबद्दल लेखकाने सांगितलेल्या आठवणी तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.१ आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** 2

(i)




(ii)




अमरावतीहून आलेली निमंत्रित मंडळी मोटारीतून जाणार होती. दाजीसाहेबांनी अब्दुलला त्यात बसवले. मोटार धावत होती. अब्दुल विचार करत होता, आज शन्नूला आणायला हवे होते तिचा घुस्सा तरी कमी झाला असता. आकाशात अष्टमीचा चंद्र हसत होता. आकाश मेघरहित निळ्या नितळाईने नटले होते वातावरण अंतर्बाह्य प्रसन्न वाटत होते. अंबादेवीच्या चौकात मोटार थांबली. अब्दुल खाली उतरला. घरी आला. अब्दुल येताच शन्नू उठली. थाळीत चपाती आणि वांग्याची भाजी घेऊन तिने थाळी अब्दुलसमोर ठेवली. अब्दुल एखाद्या अपराध्यासारखा मान खाली घालून जेवू लागला.

"तू नहीं खायेगी ?"

"नहीं, जी नहीं चाहता खानेकू।"

"अन्वर जेवला ?"
"जेवला. पण खिम्यासाठी हट्ट धरून बसला होता."
अब्दुलच्या हातातला घास हातातच राहिला. एकाएकी जेवणावरची इच्छाच मरून गेली. तोंडात घास घोळू लागला.
"कितीदा सांगितलं हा धंदा सोडून दुसरा धंदा सुरू करा. पण..." शन्नूचे पुढचे बोलणे अब्दुलने ऐकलेच नाही. तो चटकन उठला. हात धुऊन अन्वरच्या शेजारी येऊन पडला. शन्नूचे बोलणे, त्यातला शब्दन्- शब्द त्याला पाठ होता. कितीदा तरी तेच तेच ते बोलून झाले होते.
"नवीन धंदा...नवीन धंदा...भांडवल नको ? कुठून आणणार ?" तो थोडासा जोराने पण शन्नूला ऐकायला जाईल अशा आवाजात बोलला; पण भांडवलापेक्षाही त्याला अब्बाजानपासून चालत आलेला हा बांगड्यांचा धंदा सोडवत नव्हता.
...नवरात्र संपले होते. त्यात धंदा चांगला झाला. लोक आता दिवाळीच्या तयारीला लागले होते. रघुभैय्याने दुकानाला रंग देण्याचे काम काढले होते. अब्दुल दुकानावर आला. त्याचा चेहरा उदास दिसत होता.

(२) (i) **कंसातील योग्य पर्याय निवडून रिकामी जागा भरा.** **1**

त्याचा चेहरा......... दिसत होता.

(उदास, रडका, सुंदर, बोलका)

(ii) **कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **1**

''नहीं, जी नहीं चाहता खानेकू।''

कोण → [ ]

कोणास → [ ]

(३) **व्याकरण :**

(i) **समानार्थी शब्द लिहा.** **1**

(अ) ताट - [ ] (आ) कर - [ ]

(ii) **तक्ता पूर्ण करा.** **1**

| अ.क्र. | शब्द | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| (i) | शन्नूला | --------------- | द्वितीया (एकवचन) |
| (ii) | अष्टमीचा | चा | --------------- |

(४) **स्वमत :** **2**

शन्नो वारंवार कोणत्या गोष्टीचा आग्रह करत होती ? का ?

**प्र.१ इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) खालील कृती पूर्ण करा.** **2**

(i) खरा ध्येयवादी याला म्हणावा - [ ]

(ii) आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही तर - [ ]

कशासाठी काय सोडायचे हे ज्याला बरोबर कळते तोच खरा ध्येयवादी. तिथेच त्याचा खरा कस लागत असतो. 'मी आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही. फक्त वैद्यकीय मदतीचे काम करीन' असे वचन डॉ. खाइत्झर यांनी दिले होते. आणि पियानोची पेटी उघडून पाहायलाही त्यांना कित्येक दिवस सवड मिळाली नाही. लोकमान्य टिळक नेहमी म्हणत असत, 'देशाच्या स्वातंत्र्याचा लढा मला लढायचा नसता तर मी गणिताचा प्राध्यापक होऊन राहिलो असतो.' गणित हा लोकमान्यांचा आवडता विषय. पण देशाच्या सेवेसाठी त्यांनी तो सोडून दिला. ध्येयापुढे आवड बाजूला सारावी लागते. आवड म्हणजे तरी सुखच, ध्येयाशी मैत्री करावयाची तर सुखाची संगत सोडावीच लागणार. संत तुलसीदासांनी प्राणापलीकडे प्रेम असलेली पत्नी देवासाठी सोडली. देवाच्या सेवेसाठी पत्नीचा त्याग केला आणि धर्माच्या सेवेसाठी संभाजी महाराजांनी तर देहत्याग केला.

**(२) फक्त नावे लिहा.** **2**

(i) लोकमान्य टिळक यांचा आवडीचा विषय - [ ]

(ii) संत तुलसीदासांनी यांचा त्याग केला - [ ]

**(३) व्याकरण :**

**खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य लिहा.** **2**

(i) फक्त वैद्यकीय मदतीचे काम करीन.

(ii) ध्येयापुढे आवड बाजूला सारावी लागते.

**(४) स्वमत :** **2**

'संत तुलसीदास' यांच्याबद्दल तुम्हाला माहीत असलेली माहिती लिहा.

## विभाग २ – पद्य

**प्र.२ अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

(i) **कवी नारायण सुर्वे हिशोब करतात.** → [ ]

(ii) **शेकडो वेळा आला** → [ ]

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, की कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.
दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.

**(२) (i) योग्य पर्याय निवडून चौकट पूर्ण करा.** **1**

कवीने याचा विचार हरघडी केला - [ ]

(भाकरीचा, दु:खाचा, जीवनाचा, दुनियेचा)

**(ii) 'पोलाद' असे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.** **1**

**(३) दु:ख पेलावे आणि पुन्हा जगावे, या वाक्यातील तुम्हांला जाणवलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.** **2**

**(४) कवितेत व्यक्त झालेल्या कष्टकऱ्यांच्या जीवनाविषयी तुमच्या भावना लिहा..** **2**

**प्र.२ आ. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :**
**(योगी सर्वकाळ सुखदाता, अंकिला मी दास तुझा)**

**(१) कवी/कवयित्री : –** **1**
**(२) कवितेचा रचनाप्रकार : –** **1**
**(३) कवितेचा काव्यसंग्रह : –** **1**
**(४) कवितेचा विषय : –** **1**
**(५) कवी/कवयित्रीची लेखन वैशिष्ट्ये : –** **2**
**(६) मध्यवर्ती कल्पना : –** **2**

**प्र.२ इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** **4**

(१) अग्निमाजि पडे बाळू। माता धांवें कनवाळू ।।
तैसा धांवें माझिया काजा। अंकिला मी दास तुझा ।।

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **6**

(१) टिप लिहा.
बार्क

(२) तुम्हांला समजलेली कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

(३) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना शब्दबद्ध करा.

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र.४ (अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** **2**

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | जागोजागी | --------------- | --------------- |
| (ii) | पालापाचोळा | --------------- | --------------- |

(ii) **अलंकार** **2**

**पुढील ओळीतील अलंकार ओळखून दुसरे उदाहरण लिहा.**

'पेटविले पाषाण पठारावरती शिवबांनी'

(iii) **वाक्यरूपांतर** **2**

**तक्ता पूर्ण करा**

| अ.क्र. | वाक्य | वाक्याचा प्रकार | सूचनेनुसार बदल करा. |
|---|---|---|---|
| (i) | अब्दुल, बसस्टॉपवर ये. | --------------- | विधानार्थी करा. |
| (ii) | स्टेशन इथून जवळ नव्हते. | --------------- | होकारार्थी करा. |

(iv) **सामान्यरूप** **2**

**दिलेल्या शब्दांचे मूळ शब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.**

| अ.क्र. | शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| (i) | तुरुंगात | --------------- | --------------- |
| (ii) | संसाराच्या | --------------- | --------------- |

(v) **वाक्प्रचार** **2**

**खालील कंसातील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(सक्त ताकीद देणे, वर्ज्य करणे, अवहेलना करणे)

(i) ज्यांनी माझ्या उपासाचा अपमान केला होता, त्यांनीच मला डायटचा सल्ला दिला.

(ii) बाहेर कामाशिवाय जायचे नाही, असे वडिलांनी मला कडक शब्दात समजावले.

**प्र.४ (आ) भाषासौंदर्य**

**(१) शब्दसंपत्ती** **1**

(i) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**

(अ) दूसऱ्यावर अवलंबून असणारा - [ ]

(आ) आधी जन्माला आलेला - [ ]

(ii) **खालील शब्दांचे विरूद्धर्थी शब्द लिहा.** **1**

(अ) दक्षीण – [ ]   (आ) स्तुती – [ ]

(iii) **पुढील शब्दांचे भिन्न अर्थ लिहा.** **1**

[ ] ← भूषण → [ ]

(iv) **खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.** **1**

तिळपापड -

**(२) लेखननियमांनुसार लेखन**

(i) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** **1**

महिन्यापूर्वी याच यंत्राने माझे वजन एकशे ऐक्याऐंशी पौंड दाखवले होते.

(ii) **अचूक शब्द ओळखून लिहा.** **1**

(अ) सौंदर्य, सौर्दय, सेंदर्य, सौदर्य

(आ) स्मृतीदिन, स्मृतीदीन, स्मृतिदिन, स्मृतिदीन

**(३) विरामचिन्हे**

**खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे बदलून वाक्ये पुन्हा लिहा.** **2**

(i) कुठं चिरण्या नाहीत की काही नाही ?

(ii) तुम्हां टेक्नोसॅव्ही लोकांना कशाचंही ॲप करण्याशिवाय काही सुचतं की नाही !

**(४) पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** **1**

१. Computer -   २. Good will -

(५) **भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** 1

वैभव, शारदा, वीणा, शीतल

**विभाग ५ – उपयोजित लेखन**

**प्र.५ अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** 5




(२) **सारांश लेखन** 5

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

| |
|---|
| कशासाठी काय सोडायचे हे ज्याला बरोबर कळते तोच खरा ध्येयवादी. तिथेच त्याचा खरा कस लागत असतो. 'मी आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही. फक्त वैद्यकीय मदतीचे काम करीन' असे वचन डॉ. खाइत्झर यांनी दिले होते. आणि पियानोची पेटी उघडून पाहायलाही त्यांना कित्येक दिवस सवड मिळाली नाही. लोकमान्य टिळक नेहमी म्हणत असत, 'देशाच्या स्वातंत्र्याचा लढा मला लढायचा नसता तर मी गणिताचा प्राध्यापक होऊन राहिलो असतो.' गणित हा लोकमान्यांचा आवडता विषय. पण देशाच्या सेवेसाठी त्यांनी तो सोडून दिला. ध्येयापुढे आवड बाजूला सारावी लागते. आवड म्हणजे तरी सुखच, ध्येयाशी मैत्री करावयाची तर सुखाची संगत सोडावीच लागणार. संत तुलसीदासांनी प्राणापलीकडे प्रेम असलेली पत्नी देवासाठी सोडली. देवाच्या सेवेसाठी पत्नीचा त्याग केला आणि धर्माच्या सेवेसाठी संभाजी महाराजांनी तर देहत्याग केला. |

**प्र.५ आ. खालील कृती सोडवा.**

**(१) खालील विषयावर बातमी तयार करा.** **6**

इंधन दरवाढीचा शेतकऱ्यांना फटका.

**(२) खालील दिलेल्या मुद्द्यांवरून कथा तयार करा. कथेला योग्य शीर्षक द्या.** **6**

मुद्दे : शिंप्याचे दुकान – रस्त्यावरून हत्तीचे नदीला जाणे – शिंप्याच्या दुकानापाशी थांबणे – खाऊ मिळणे – शिंप्याला सलाम – एके दिवशी शिंपी गंमत करतो – सोंडेला सुई टोचतो – हत्तीला वेदना – नदीजवळचे घाणेरडे पाणी सोंडेत घेतो – शिंप्याच्या दुकानात फवारा उडवतो

**प्र.५ इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२०शब्द)** **8**

**(१) किल्ल्याचे आत्मवृत्त**

१. गौरवशाली इतिहास
२. थोर व्यक्तींचा सहवास
३. समाधान
४. वर्तमानातील अनुभव
५. वैभवाचा नाश
६. दु:ख.



**(२) मी चित्रकार झालो तर ...**




**Best Of Luck**